दै. लोकसत्ता

17 JUL 2017

# पीएमपीएमएलकडून दिव्यांगांना 'मी कार्ड' मोफत पासचे वितरण

**प्रतिनिधी, पुणे**

**पुणे महानगर** परिवहन महामंडळाच्यावतीने (पीएमपीएमएल) दिव्यांग, दृष्टिहिन प्रवाशांना 'मी कार्ड' स्वरूपातील मोफत बस पासचे वितरण करण्यास शनिवारपासून सुरुवात करण्यात आली.

महामंडळाकडे दिव्यांग, दृष्टिहिन प्रवाशांच्या मोफत बस पाससाठी आलेल्या एकूण अर्जांपैकी पहिल्या टप्प्यात २ हजार ११२ पासचे वितरण करण्यात येणार आहे. या प्रवाशांच्या सोयीसाठी स्वारगेट आगारातील इमारतीमध्ये तळमजल्यावर मोफत पाससाठीचा कक्ष सुरू करण्यात आला आहे. ज्या दिव्यांग, दृष्टिहिन प्रवाशांना या योजनेचा लाभ घ्यायचा आहे, त्यांनी स्वारगेट आगार येथील परिवहन महामंडळाचा पास विभाग येथे संपर्क करण्याचे आवाहन महामंडळाकडून करण्यात आले आहे. पीएमपीएमएलचे व्यवस्थापकीय संचालक तुकाराम मुंढे यांच्या हस्ते प्रातिनिधिक स्वरूपात विजय जाधव, पंकज खंडागळे, प्रकाश सांगवे आणि शीतल आबनावे या प्रवाशांना 'मी कार्ड' मोफत पासेसचे वितरण करण्यात आले. सहव्यवस्थापकीय संचालक राजेश जाधव या वेळी उपस्थित होते.



**पुणे महानगर परिवहन महामंडळाच्यावतीने (पीएमपीएमएल) दिव्यांग, दृष्टिहिन प्रवाशांना 'मी कार्ड' स्वरूपातील मोफत बस पासचे वाटप व्यवस्थापकीय संचालक तुकाराम मुंढे यांच्या हस्ते करण्यात आले.**

'मी कार्ड' मोफत पाससाठी पासधारकाचे छायाचित्र, संपूर्ण माहिती संगणकीय स्वरूपात संकलित असून या स्वरूपातील पाससाठी महामंडळाकडून कोणत्याही प्रकारचे शुल्क आकारले जात नाही.